# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/04/2023 (शुक्रवार) सकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना अटक

१) पो.स्टे. बोरी :–अंतर्गत ०१ कि. मी अंतरावर माया हॉस्पिटल समोर सिमेटच्या पक्क्या रूम मध्ये बुटीबोरी येथे दिनांक ०६/०४/२०२३ चे १३.०२ वा. सुमारास **मृतक नामे– ताराचंद तुळशीराम चौधरी, वय ४६ वर्ष रा. मसाळा, सातगाव बुटीबोरी** यांचे प्रेत मिळुन आले. प्रेत कुजलेले व चेहरा कुजलेला सुजलेला असून प्रेताचे डोक्याला मार असुन प्रेताचे बाजुला रक्त जमीनीवर पडलेले दिसत होते. फिर्यादी नामे– दुर्गेश ताराचंद चौधरी, वय २५ वर्षे रा. मसाळा, सातगाव बुटीबोरी याला नमुद ठिकाणी बोलावुन मृतकाचे आधारकार्ड, मृतकाचे दंडावर व हाताचे पोटरीवर असलेल्या गोंदण व मृतकाचे शरीरयष्ठी वरून मृतकाची ओळख पटविण्यात आली असुन फिर्यादीने मृतक हे त्याचे वडील असल्याचे सांगतिले मृतक आणि फिर्यादी व त्याची आई नामे– निताबाई ताराचंद चौधरी हे सन २०१७ पासुन वेगळे राहात असुन मृतक हा त्याचे मित्र अनिल सहानी आणि कुंजी कश्यप यांचे सोबत वरील घटनास्थळी राहात होते व भंगार वेचण्याचे काम करत होते. फिर्यादीचे वडील मृतक ताराचंद तुळशीराम चौधरी यांना **आरोपी नामे–१) कुंजबिहारी रामसींग कश्यप, वय ४८ वर्ष रा. ज्ञानदीन शाळेजवळ सातगाव बुट्टीबोरी २) अनिल कोमल साहानी, वय ४४ वर्ष, रा कवळीराम गोरखपुर उत्तर प्रदेश ह. मु. समृध्दी हॉटेलच्या बाजुला दीलवर खान** यांचे घराचे बांधकाम चालु असलेल्या खाली जागेत यांनी अज्ञात कारणावरून फिर्यादीचे वडील मृतक यास जिवानिशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि. भिमाजी पाटील पोलीस स्टेशन बुटीबोरी मो. क्र. ८९९९४१७०९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. उमरेड :–अंतर्गत ०३ कि. मी अंतरावर मौजा गांगापूर उमरेड ता. उमरेड जि. नागपूर येथे दिनांक ०६/०४/२०२३ चे १४:३० वा ते १४:४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– किरण कोटीराम हटवार, वय ३० वर्ष रा. गांगापूर उमरेड जि. नागपूर व मृतक नामे– अनीस अजीज शेख, वय २८ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड व **आरोपी नामे– १) नितेश हरी मोहीनकर वय २८ वर्ष, २) रघुवीर शिवा मोहीनकर, वय ३० वर्ष, दोन्ही रा. गांगापूर उमरेड ता. उमरेड जिल्हा नागपूर** हे एकाच गावात राहणारे असुन एकमेकांना ओळखतात नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हे हजर असतांना नमुद आरोपी व मृतक यांचा आपसात झगडा भांडण करुन मृतक याने दोन्ही आरोपीतांच्या आई, बहीणीच्या नावाने शिवीगाळ दिल्याच्या कारणावरुन आरोपी क्र. १ व २ यांनी संगणमत करुन मृतकाला हाथबुक्याने मारहान करुन चिडुन जावुन आरोपी क्र. १ याने घटनास्थळाजवळ असलेल्या लाकडी दांडयाने मृतकाचे डोक्यावर, छातीवर, तोंडावर मारुन जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम ३०२, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/प्रशांत खोब्रागडे, पो स्टे उमरेड मो. नं. ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर